# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ 248 /२०२१
दिनांक : 17 APR 2021

प्रति,
मे.-------------------------------------------------

-------------------------------------------------

-------------------------------------------------

विषयः- अखंड मिरची व धने… दरपत्रक मागणी..

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे अखंड मिरची व धनेची खरेदी दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अनुसरून करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे परिशिष्टात भरून परिशिष्ट आपले लेटरहेडवरील कव्हरींग पत्रासह सादर करावे.

**अटी/शर्ती –**

१. अखंड मिरची व धनेचे दर भरतांना त्यावर आकारला जाणारा **GST व TDS, तसेच वाराई शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागात पोहचचा वाहतूक खर्च, माल शिर्डी येथे पोहोचलेनंतर वाहनातून उतरावयाची वाराई तसेच आणखी यामध्ये आपणास काही खर्च येत असल्यास तो सर्व खर्च यामध्ये धरुन सोबतचे परिशिष्टात प्रती क्विंटलचे दर नमूद करावेत.** त्यानंतर परिशिष्ठ आपल्या दुकानाचे कव्हरींग पत्रासह दयावयाचे आहेत.
२. दरपत्रकासोबत GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, FSSAI लायसन्स व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.
३. दरपत्रकासोबत १०० ग्रॅम ते २५० ग्रॅमपर्यंत अखंड मिरची व अखंड धनेचा नमुना स्वतंत्र प्लॅस्टिक पिशवीमध्ये संस्थानचे खरेदी विभागामध्ये सादर करावा.
४. मिरची व धनेचे नमुने योग्य न वाटल्यास दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
५. पुरवठा आदेश दिल्यानंतर आपण दरपत्रकासोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवावा लागेल.
६. सदर दरपत्रकाची वैधता दरपत्रकाचे अंतिम तारखेपासून १ महिना राहील याचा दर भरतांना दरपत्रकधारकाने विचार करावा.
७. शिर्डी संस्थान हे धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

८. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहाणार नाही.
९. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **"अखंड मिरची व धने खरेदी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
१०. मिरची व धने पुरविलेनंतर साधारण १ महिन्यात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी संस्थानकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.
११. संस्थानकडून पुरवठा आदेश दिलेनंतर ३-४ दिवसांत मिरची व धनेचा पुरवठा करावा लागेल.
१२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.
१३. दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक २४ / ०४ /२०२१.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

खरेदी विभाग

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**अखंड मिरची व धने खरेदी दरपत्रक परिशिष्ट**

| अ.नं | मालाचा तपशिल | मागणी क्विंटल | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | Coriander Seeds (Dhane)- Akhand, Gavran, Stonless | १० | | |
| २ | Chillies (Mirchi) Guntur,Akhand, Red Dethasah, Dry | १० | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का